DR(Admin)/87
07/03/2016

# University of Mumbai

अत्यंत महत्वाचे
स्पिड पोस्टाने/हस्तेबटवडा

Inward No. 1618
29 FEB 2016
UNIVERSITY OF MUMBAI

क्र.वि.क./आसीसी/२०१५-१६/ ९९

परिपत्रक :

विषय :- ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या गावातील विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क माफ करणेबाबत.

संदर्भ :- १. महसूल व वन विभागीय यांचे शुध्दीपत्रक क्र. एससीवाय-२०१५/प्र.क्रं.३११/म-७, दि. ०९/११/२०१५.

२. संचानालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/अवर्षण/२०१५-१६/१२४८५, दि. ३/१२/२०१५.

सर्व प्राचार्य / संचालक (अनुदानित व विना अनुदानित) कला, वाणिज्य व विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालये व संस्था तसेच प्राचार्य, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, विभाग प्रमुख/ संचालक विद्यापीठांचे विविध विभाग, यांना कळविण्यात येते की, सह संचालक उच्च शिक्षण, शिक्षण संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/१५-१६अ.वि.फी.माफी/१२७७५ दिनांक ८ डिसेंबर, २०१५ च्या पत्रामधिल संदर्भ क्र. १ अन्वये शासनाने सन २०१५-१६ च्या खरीप हंगामात जिल्हाधिकारी यांनी ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी घोषित केलेल्या १५७४७ गावांमध्ये दुष्काळग्रस्त परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. असे कळविले असुन त्यानुसार संदर्भ क्र. २ अन्वये त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी सविस्तर सुचना शासनाने दिलेल्या आहेत.

तसेच असेही नमुद केले आहे की, १५७४७ गावातील विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क माफ करावयाचे असेल तर शासनावर किती आर्थिक भार येईल याची माहिती शासनास तात्काळ सादर करावयाची आहे. विद्यापीठाच्या अधिनस्त महाविद्यालयांत उपरोक्त १५७४७ गावांतील जे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यांना शिक्षण शुल्क माफ करावयाचे असल्यास किती आर्थिक भार येईल याबाबत संचालनालयास खालील प्रपत्रात तात्काळ माहिती सादर करण्याबाबत कळविले आहे.

प्रपत्र

| अ.क्र. | विभागाचे नाव | शिक्षण शुल्क माफीसाठी येणारा आर्थिक भार | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | अनुदानीत महाविद्यालये | विनाअनुदानीत महाविद्यालये | |
| | | | | |

उपरोक्त विद्यार्थ्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागाकडून शिष्यवृत्ती मिळते किंवा ई.बी.सी. धारक आहेत त्यांना यापूर्वीच शिक्षण शुल्क माफ केले जात असल्याने त्यांचा समावेश आर्थिक भार काढताना करु नये.

आपणांस असेही कळविण्यात येते की, वरिल माहिती त्वरीत उपकुलसचिव विशेष कक्ष खोली क्र. १३४ मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई यांना पाठविण्यात यावी आणि त्याची प्रत dr.specialcell@fort.mu.ac.in या ईमेलवरती पाठविण्यात यावी.

DR(Admin)

दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१६
ठिकाण : मुंबई.

23/2/16
(डॉ. एम ए खान)
कुलसचिव

सर्व प्राचार्य / संचालक (अनुदानित व विना अनुदानित) कला, वाणिज्य व विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालये व संस्था तसेच प्राचार्य, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, विभाग प्रमुख/ संचालक विद्यापीठांचे विविध विभाग.

23/2/16
(डॉ. एम ए खान)
कुलसचिव

AR(Admin)
IDOL
2/3